सुविचार
श्वास घेणं आणि सोडणं ह्याला जगणं म्हणत नाहीत,
प्रत्येक श्वास घेताना आसमंतातल्या सुगंधाचा प्रत्यय आला पाहिजे.

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

SPB
SHRI PISARNATH BROADBAND
श्री.संतोष अरविंद शेलार - उपनगराध्यक्ष, माथेरान, ८७९३३११०४४
संत गाडगे महाराज रोड, माथेरान रेल्वे स्टेशनच्या मागे ता.कर्जत जि. रायगड (माथेरान) - ४१०१०२

वर्ष : ०५ | अंक : ३२८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.०९ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# नाशिकमध्ये पावसाचा प्रकोप; रस्ते खचले, नद्यांना पूर

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, नाशिक :** नाशिक शहरात गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. काल आणि आज पहाटे पासूनच पावसाने जोरदार हजेरी लावली. ७ जुलै सकाळी साडे आठ ते ८ जुलै रोजी सकाळी साडे आठ पर्यंत तब्बल २७० मिमी इतकी पावसाची नोंद करण्यात आली आहे. यामुळे शहरातील जनजीवन हे पूर्णपणे विस्कळीत झाल्याचे चित्र ठिकठिकाणी दिसून आले.



शहरातील प्रमुख नदी गोदावरी आणि नंदिनी नदी यांना मोठ्या प्रमणात पूर आला होता. पुराचे मापदंड समजल्या जाणाऱ्या दुतोंड्या मारुतीच्या छातीला पुराचे पाणी टेकले होते. तर मिलिंद नगर भागात नंदिनी नदीचे पुराचे पाणी हे थेट काही लोकांच्या घरात शिरले होते. दोन दिवसांपासून शहरात पावसाचा चांगलाच कहर पाहायला मिळाला.

**नाशिकला मुसळधार पावसाचा इशारा...**

नाशिक शहर सोबतच त्र्यंबकेश्वर येथे दोन दिवसांपूर्वी भारतीय हवामान खात्याकडून ढगफुटी सदृश्य पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली होती. तर नाशिक शहराला देखील मुसळधार पाऊस होण्याचा इशारा हा देण्यात आला होता.

**दोन दिवसांच्या पावसाने जनजीवन विस्कळीत**

वातावरणीय बदलामुळे त्र्यंबकेश्वरवरील ढगफुटीसदृश पावसाचे संकट हे टळल्याचे दिसून आले. मात्र ७ जुलैच्या पहाटे दीड वाजल्यापासून ते आज दिवसभर पावसाची संततधार कायम होती. या दोन दिवस झालेल्या पावसामुळे शहरातील जनजीवन हे पूर्णपणे विस्कळीत झाले.

**दुतोंड्या मारुतीच्या छातीपर्यंत पुराचे पाणी**

नाशिक शहरातील गोदावरी नदीला कालपासून पूर आला आहे. यानंतर आज नदीच्या पूर परिस्थितीमध्ये आणखी वाढ झाली होती. दुतोंड्या मारुतीच्या छातीपर्यंत हे पुराचे पाणी लागले होते. यामुळे रामकुंड परिसरात पार पडणाऱ्या धार्मिक विधींवर याचा परिणाम झाल्याचे दिसून आले.

**अनेक पूल पाण्याखाली**

पुराचे पाणी हे नंदिनी नदीवर बांधलेल्या तिडके कॉलनी, पाखलरोड यांसह अनेक ठिकाणचे पूल हे पुराच्या पाण्याखाली गेले होते, ज्यामुळे येथून होणारी वाहतूक ही खबरदारी म्हणून प्रशासनाकडून बंद करण्यात आले होती.

**वाहनचालकांची मोठी तारांबळ**

संपूर्ण शहरातील अनेक ठिकाणचे रस्ते हे पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने रस्त्यांनाच नदीचे स्वरूप प्राप्त झाले होते. त्यामुळे एक ठिकाणाहून दुसरीकडे जाण्यासाठी वाहनचालकांची मोठी फजिती झाली होती. काही ठिकाणी तर रस्तेच खचल्याने शाळकरी वाहने, मध्यम आणि मोठ्या स्वरूपाची वाहनेही या खचलेल्या रस्त्यातच अडकून पडले होते.

**दोन दिवस शाळांना सुट्टी**

पावसाचा अंदाज लक्षात घेता महापालिका प्रशासनाकडून देखील खबरदारी म्हणून आज देखील मनपा हद्दीतील प्राथमिक, माध्यमिक विद्यालय यांना सुट्टी जाहीर करण्यात आली होती. जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाकडून देखील स्थापन करण्यात आलेल्या स्वतंत्र कक्षामार्फत जिल्ह्यात घडणाऱ्या सर्व घटनांकडे लक्ष ठेवून होते.

**मदत कक्षांवर संपर्क साधण्याचं आवाहन...**

अद्याप देखील हवामान विभागाकडून पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला असून नागरिकांनी योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आलं आहे. तसेच कुठेही काहीही घटना घडल्यास तत्काळ तालुक्यानुसार जारी करण्यात आलेल्या मदत कक्षावर संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**६ तालुक्यांमधील शाळांना सुट्टी, पर्यटनस्थळेही बंद**

भारतीय हवामान खात्याकडून नाशिक जिल्ह्यासाठी उद्यासाठी 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. ९ जुलै २०२६ रोजी जिल्ह्यातील घाटमाथ्यावर मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

जिल्हा प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून जिल्ह्यातील ६ तालुक्यांमधील पूर्व प्राथमिक तसेच इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहित कुमार राजपूत यांनी याबाबत माहिती दिली.

# मोठी दुर्घटना, पिंपरी चिंचवडमध्ये इमारत कोसळली १४ जण अडकल्याची भीती...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, पुणे :** राज्यभरात मुसळधार पावसाचा धुमाकूळ सुरु आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यांना पावसाचा मोठा फटका बसला. त्यानंतर आता नाशिक, पुणे जिल्ह्यांनाही पाऊस झोडपताना दिसत आहे. लोणावळा आणि मावळ परिसरात मुसळधार ते अतिमुसळधार स्वरुपाचा पाऊस पडत आहे. तसेच पुणे जिल्ह्यात सर्वदूर मुसळधार पाऊस सुरु आहे. मुसळधार पावसामुळे नद्या दुथडी भरुन वाहत आहेत. पण या मुसळधार पावसात एक अनपेक्षित आणि अप्रिय घटना घडल्याची माहिती समोर येत आहे. पुण्यात इमारत कोसळ्याची घटना घडली आहे.

पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड शहरात मोशी कचरा डेपोजवळ इमारत कोसळल्याची घटना घडली आहे. या घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. घटनेनंतर स्थानिकांनी तातडीन मदतकार्याला सुरुवात केली. तसेच पोलिसांना या घटनेची माहिती देण्यात आली. पोलीस, अग्निशामक दलाचे जवान आणि इतर प्रशासन घटनास्थळी दाखल झालं आहे. बचावकार्य युद्ध पातळीवर सुरु झालं आहे. या घटनेमुळे परिसरात चिंता व्यक्त केली जात आहे. अडकलेले नागरिक सुखरुप असावेत, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

**वेस्ट एनर्जी प्रकल्पाची इमारत कोसळल्याची माहिती**

पिंपरी चिंचवडमध्ये वेस्ट एनर्जी प्रकल्पाची इमारत कोसळल्याची माहिती समोर येत आहे. या घटनेत १४ जण अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. तर इतर एकाला रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. संबंधित व्यक्ती गंभीर जखमी आहे.

कचरा डेपो शेजारी असणाऱ्या वेस्ट टू एनर्जी प्रकल्पावर कचरा कोसळल्याने इमारत पडल्याचं सांगितलं जात आहे. दुसऱ्या मजल्यावरील अडकलेल्या कर्मचाऱ्यांना काढण्यात आलं आहे. पहिल्या मजल्यावर १४ जण अडकले असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

**नेमंक काय घडलं?**

टाइम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार, संबंधित घटना ही आज दुपारी १ वाजून ४५ मिनिटांनी घडली. ही इमारत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मोशी येथील वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाची तीन मजली इमारत आहे. या इमारतीत कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्पाची प्रशासकीय कार्यालये आहेत. या इमारतीच्या पाठीमागे असणारा कचरा इमारतीवर कोसळला. यामुळे ही इमारतीचा सांगाडा कोसळल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

**युद्ध पातळीवर बचावकार्य सुरु**

घटना घडल्यानंतर अग्निशामक दलाच्या जवानांनी मोठ्या प्रमाणात बचावकार्याला सुरुवात केली. घटना मोठी असल्यामुळे एनडीआरएफच्या पथकाला घटनास्थळी पाचरण करण्यात आलं. आता या घटनेत अडकलेल्या कर्मचाऱ्यांना बाहेर काढण्यासाठी शोध मोहीम राबवली जात आहे. सध्या इमारतीवर कोसळलेल्या कचऱ्याचा ढिगारादेखील जेसीबीच्या सहाय्याने बाजूला केला जात असल्याची माहिती आहे. बचावकार्य युद्ध पातळीवर सुरु आहे.

# माऊली माऊली च्या जयघोषात माऊलींच्या पालखीचे पंढरीकडे प्रस्थान !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, आळंदी (पुणे) :** टाळमृदंगाचा टिपेला गेलेला गजर, ज्ञानोबा माउली नामाचा अखंड जयघोष, देहभान विसरुन नाचणारे वैष्णव, पालखीकडे खिळलेल्या वारकऱ्यांच्या नजरा, अशा भक्तीमय

वातावरणात वीणा मंडपातील पालखी खांद्यावर घेतली अन् भाविकांच्या उपस्थितीत पुंडलिका वरदे हरि विठ्ठलचा जयघोष झाला. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीने बुधवारी सायंकाळी सहा वाजून २० मिनिटांनी पंढरीकडे प्रस्थान ठेवले.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या १९५ व्या आषाढी पायीवारी प्रस्थान सोहळ्यास पहाटे चारला घंटानादाने प्रारंभ झाला. काकडा, पवमान अभिषेक, पंचामृतपूजा, दुधारती करण्यात आली. त्यानंतर मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. दुपारी बारा वाजता महानैवेद्य अर्पण केल्यानंतर दर्शन बंद करुन मंदिर परिसराची स्वच्छता करण्यात आली. दुपारी अडीच वाजल्यापासून प्रस्थान सोहळ्याची तयारी सुरू झाली.

माउलींच्या समाधीवर मुखवटा ठेवून तुळशीहार व गुलाबपुष्पांचा हार घालण्यात आला. रथापुढे व रथामागे असणाऱ्या मानाच्या ४७ दिंड्यांमधील प्रत्येकी ५० वारकऱ्यांना महाद्वारातून मंदिरात प्रवेश देण्यास सुरुवात करण्यात आली. वीणा टाळ-मृदंगाच्या गजराने माउली तुकारामांच्या - जयघोषाने मंदिर व आजूबाजूचा परिसर भक्तिमय झाला होता. दुपारी तीनच्या सुमारास पालखी प्रस्थानाच्या मुख्य सोहळ्याला सुरुवात झाली.

श्रीगुरु हैबतबाबा यांच्या तर्फे श्रींची आरती झाली. त्यानंतर माउली संस्थानातर्फे श्रींची आरती झाली. वैभवी चांदीच्या पादुका प्रस्थानासाठी पुष्पसजावटीने सजलेल्या चौथऱ्यावर वीणा मंडपात ठेवण्यात आल्या. चलपादुकांची विधिवत प्राणप्रतिष्ठा झाली. सर्वांच्या मुखी 'ज्ञानोबा तुकाराम', 'माउली माउली', 'ज्ञानोबा माउली तुकाराम' असा गजर सुरू होता. उत्तरोत्तर



सोहळ्याची रंगत वाढतच गेली. सोहळा सुरू असताना दिंड्यांमधील भगवे ध्वज डौलाने फडकत होते. त्यानंतर माउलींचे मानाचे दोन अश्व मंदिरात आणण्यात आले. अश्वांनी मंदिराला प्रदक्षिणा घातली. अश्व महाद्वारातून बाहेर पडताच रथापुढील दिंड्या मंदिराबाहेर सोडण्यास सुरुवात करण्यात आली.

**पालखीचा पहिला मुक्काम गांधीवाड्यात**

उत्साही वातावरणात पालखीची मंदिराला प्रदक्षिणा झाली. पालखी मुक्कामासाठी आजोळी गांधीवाड्यात दाखल झाली. आज गुरुवारी सकाळी सहाच्या सुमारास पालखी सोहळा पुण्याकडे मार्गस्थ होणार आहे.

# राष्ट्रवादी युवती प्रदेशाध्यक्षा संध्या सोनवणे यांना शासनाचा मोठा बहुमान



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, अहिल्यानगर :** कोणतीही मोठी राजकीय पार्श्वभूमी पाठीशी नसताना, केवळ जनसामान्यांशी असलेली नाळ आणि धगधगत्या संघर्षाच्या जोरावर राजकारणात स्वतःचे अढळ स्थान निर्माण करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) युवती प्रदेशाध्यक्षा संध्या सोनवणे यांची जिल्हा नियोजन समितीच्या विशेष निमंत्रित सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने ६ जुलै २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार ही घोषणा करण्यात आली असून, या निवडीमुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड येथील सर्वसामान्य कुटुंबातून आलेल्या एका खऱ्या आणि अभ्यासू महिला नेतृत्वाच्या संघर्षाचा योग्य सन्मान झाला आहे.

संध्या सोनवणे यांचा राजकीय आणि सामाजिक प्रवास हा अत्यंत खडतर आणि प्रेरणादायी राहिला आहे. ग्रामीण भागातील एका सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या संध्या यांनी सुरुवातीपासूनच समाजातील तळागाळातील घटकांचे प्रश्न जवळून अनुभवले. कौटुंबिक आणि सामाजिक पातळीवर अनेक आव्हानांचा सामना करत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले आणि सामाजिक कार्यात स्वतःला झोकून दिले. महिलांचे हक्क, आरोग्य, ग्रामीण भागातील पाणी प्रश्न आणि तरुणांच्या रोजगारासाठी त्यांनी अनेकदा रस्त्यावर उतरून आंदोलने केली. त्यांनी केलेला हाच मैदानी संघर्ष त्यांच्या राजकीय प्रवासाचा पाया ठरला. त्यांच्या याच अफाट जनसंपर्काची आणि पक्षसंघटन कौशल्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर युवती प्रदेशाध्यक्ष पदाची मोठी जबाबदारी सोपवली होती,जी त्यांनी अत्यंत प्रभावीपणे पेलली.

जिल्हा नियोजन समिती ही जिल्ह्याच्या आर्थिक आणि पायाभूत विकासाची दिशा ठरवणारी सर्वोच्च यंत्रणा मानली जाते. संध्या सोनवणे यांच्याकडे असलेला दांडगा लोकसंपर्क, ग्रामीण भागाच्या प्रश्नांची अचूक जाण आणि प्रशासकीय कामांचा अभ्यास यामुळे जिल्ह्याच्या विकास आराखड्याला एक नवी आणि सकारात्मक दिशा मिळणार आहे.

विशेषतः शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकांपर्यंत पोहचवणे आणि जिल्हा पातळीवर महिलांचे प्रतिनिधित्व अधिक सक्षम करणे, यासाठी त्या महत्वपूर्ण भूमिका बजावतील असा विश्वास व्यक्त होत आहे. शासनाच्या या निर्णयाचे जिल्ह्यातील सर्वच स्तरांतून उत्स्फूर्त स्वागत केले जात आहे. एका सर्वसामान्य कार्यकर्त्याला जिल्हा नियोजन समितीत मिळालेले हे स्थान इतर प्रमाणिक कार्यकर्त्यांसाठी उर्जा देणारे ठरले आहे.

संध्या सोनवणे यांच्या या निवडीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी, विविध सामाजिक संघटना आणि कार्यकर्त्यांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आगामी काळात त्या जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि जनतेच्या हक्कासाठी अधिक आक्रमकपणे काम करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ११ नगरसेवकांचा दबदबा, पण शिळ-दिवा रोड मात्र खड्ड्यात!

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०८, दिवा (ठाणे) :** दिवा प्रभाग समितीमध्ये ११ नगरसेवकांचा दबदबा असूनही शिळ-दिवा रोडची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

सुदामा ग्रील, डम्पिंग रोड, दिवा सर्कल, महाकालेश्वर मंदिर, दुर्गा मंदिर आणि अग्निशामक दल स्थानक या ठिकाणी तर खड्ड्यांचे साम्राज्य आहे. या खड्ड्यांमुळे दुचाकी चालक वारंवार पडत असून अनेक नागरिक जखमी झाले आहेत.

**रोज जातात, पण दिसत नाही का?**

दिवा प्रभागातील ११ नगरसेवक दररोज याच रस्त्याने ये-जा करतात. तरीही त्यांच्या डोळ्यांना हे खड्डे दिसत नाहीत का, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

आम्ही टॅक्स भरतो, टोल भरतो. पण रस्ता दुरुस्तीसाठी कोणीही पुढाकार घेत नाही. एका खड्ड्यात गाडी गेली की हाडं मोडण्याची पाळी येते. तरीही लोकप्रतिनिधी गप्प, अशी संतापजनक प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली.

**अपघाताचा धोका वाढला**

१) रात्रीचा प्रवास धोकादायक रस्त्यावर लाईट नाहीत आणि खड्डे दिसत नाहीत

२) शाळेच्या मुलांना त्रास महाकालेश्वर मंदिर आणि दुर्गा मंदिर परिसरात शालेय विद्यार्थी पडत आहेत

३) वाहनांचे नुकसान - रोज शेकडो वाहनांच्या सस्पेन्शन आणि टायरचे नुकसान होत आहे.

**प्रशासनाचे डोळे उघडणार का?**

दिवा प्रभाग समिती, ठाणे महापालिका, दिवा प्रभाग समिती,सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अनेकदा तक्रारी देऊनही अद्याप खड्डे बुजवण्यात आले नाहीत.

११ नगरसेवक आहेत मग काम कोण करणार? सगळेच एकमेकांकडे बोट दाखवतात. आता तरी प्रशासनाने डोळे उघडून किमान हे खड्डे तरी भरावेत, अशी मागणी दिवेकर नागरिक करत आहेत.

**नागरिकांची मागणी**

१) तातडीने संपूर्ण शिळ-दिवा रोडवरील खड्डे बुजवावेत

२) रस्त्याची कायमस्वरूपी डागडुजी करावी

३)अपघात झाल्यास जबाबदारी कोणाची हे स्पष्ट कराव




## ‘आर्थिक आणीबाणी’ची तरतूद

काही दिवसांपूर्वी पश्चिम आशियातील युद्ध परिस्थितीमुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी ह्यांनी नागरिकांना वाहन इंधनाची बचत करणे, किमान एक वर्षासाठी सोन्याची खरेदी पुढे ढकलणे, परदेश प्रवास टाळणे इत्यादी बाबींचे आवाहन केले होते. आता परिस्थिती निवळली असली तरी त्या भूभागात वा जगात अन्य ठिकाणी पुन्हा अशी परिस्थिती निर्माण होणारच नाही, असे नाही. यावरून घटनेच्या अनुच्छेद (कलम) ३६० मध्ये असलेल्या ‘आर्थिक आणीबाणी’ विषयक एका निद्रीस्त तरतुदीची आठवण होते. २६ जानेवारी १९५० रोजी घटना अंमलात आल्यापासून आजतागायत या तरतुदीचा वापर एकदाही करण्यात आलेला नाही.

कलम ३६० मधील तरतुदीनुसार जर राष्ट्रपतींची अशी खात्री पटली, की भारताची किंवा भारताच्या कोणत्याही भागाची आर्थिक स्थिरता अथवा पत धोक्यात आल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, तर ते एका उद्घोषणेद्वारे आर्थिक आणीबाणीची घोषणा करू शकतात. ही उद्घोषणा आर्थिक परिस्थितीचे वस्तुनिष्ठ विश्लेषण आणि प्रशासकीय माहितीच्या आधारेच केली जाते. या उद्घोषणेला संसदेच्या दोन्ही सभागृहांनी, साध्या बहुमताने दोन महिन्यांच्या आत मंजुरी देणे आवश्यक असते. अशा आणीबाणीच्या काळात, केंद्र सरकार राज्यांना आर्थिक निर्देश जारी करू शकते. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांचे न्यायाधीश यांच्यासह सरकारी आधिकाऱ्यांचे वेतन कमी करण्याच्या निर्दे शांचाही यात समावेश असू शकतो.

न्यायालयांची भूमिका

करोना महासाथीच्या काळात, सर्वोच्च न्यायालयात अनेक जनहित याचिका दाखल करण्यात आल्याचे वृत्त होते. ‘सेंटर फॉर अकाउंटेबिलिटी अँड सिस्टेमिक चेंज’ ह्या संस्थेने अशीच एक याचिका दाखल केली होती. या याचिकेमुळे एक विशिष्ट प्रश्न उपस्थित झाला तो म्हणजे आर्थिक आणीबाणी लागू करण्याचे निर्देश देणारा ‘परमादेश’ (थॲळीं ेष चरपवरींी) सर्वोच्च न्यायालय केंद्र सरकारला/गृह मंत्रालयाला/राष्ट्रपतींना देऊ शकते का? ह्यावर न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले होते, की न्यायपालिकेला काही अंगभूत मर्यादा असतात. न्यायपालिकेचे कार्य हे विवादांचा निवाडा करणे हे आहे, देशाचा कारभार चालवणे हे नाही. प्रशासन चालवण्याचे कार्य हे प्रशासकीय यंत्रणेच्या आधिकारक्षेत्रात येते. न्यायपालिकेचे कार्य हे केवळ देशाचा कारभार संविधान आणि कायद्यांनुसारच चालवला जात आहे ना व लोकशाहीचा कोणी स्तंभ आपल्या मर्यादांचे उल्लंघन तर करत नाहीत ना हे पाहणे आहे. अन्य स्तंभाच्या आधिकारक्षेत्रातील आधिकारांच्या वापरामध्ये न्यायालय हस्तक्षेप करू शकत नाही.

आर्थिक संकटाचा सामना नेमका कसा करायचा, हा पूर्णपणे सरकारी धोरणाचा भाग आहे. जर या आधिकाराची व्याख्या ‘कर्तव्याशी जोडलेला आधिकार’ अशी केली गेली असती, तर जेव्हा जेव्हा आर्थिक अस्थिरता निर्माण होईल तेव्हा तेव्हा आणीबाणी जाहीर करणे अनिवार्य ठरले असते आणि जर राष्ट्रपतीनी तसे केले नसते, तर न्यायालयांना त्यात हस्तक्षेप करावा लागला असता.

कलम ३६० अन्वये राष्ट्रपती ज्या आधिकाराचा वापर करतात, तो आधिकार कलम ७४(१) अंतर्गत मंत्रिमंडळाने दिलेल्या सल्ल्यानुसार वापरला जातो. आणीबाणीची ही घोषणा संबंधित परिस्थिती अस्तित्वात असल्याबाबत राष्ट्रपतींचे जे समाधान होते, त्यावर अवलंबून असते; परंतु या निर्णयाचे न्यायिक पुनर्विलोकन सर्वोच्च न्यायालय करू शकते.

‘स्टेट ऑफ राजस्थान विरुद्ध युनियन ऑफ इंडिया’ या खटल्यात, अनुच्छेद ३५६ अन्वये राष्ट्रपती राजवट लागू करण्याच्या संदर्भात, न्यायमूर्ती भगवती यांनी असा निर्णय दिला, की न्यायिक पुनर्विलोकनाची व्याप्ती अत्यंत मर्यादित आहे. राष्ट्रपतींची कृती ही ‘दुष्ट हेतूने प्रेरित’ किंवा ‘बाह्य’ वा ‘असंबंधित’ कारणांमुळे केलेली नाही ना एवढेच न्यायालय तपासू शकते. देशात आजवर एकदाही ‘आर्थिक आणीबाणी’ जाहीर करण्यात आलेली नसल्यामुळे त्या आणीबाणीच्या निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याची वेळच सर्वोच्च न्यायालयावर आलेली नाही.

**- विजय गोखले**

# कलात्मक दिग्दर्शक गुरुदत्त !

**अगदी थोड्या काळात ज्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटून हिंदी चित्रपट सृष्टीत आपले नाव अजरामर केले त्या हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते गुरुदत्त यांची आज जयंती. आज त्यांची १०१ वी जयंती. गुरुदत्तजींच्या १०१ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देणारा हा विशेष लेख.**

गुरुदत्त हिंदी चित्रपट सृष्टीत जिवंतपणीच अख्यायिका बनलेले व्यक्तिमत्व. आजही गुरुदत्त यांचे नाव घेतले की आठवतात ते त्यांचे कलात्मक चित्रपट मग ते चौदहवी का चांद असोत की कागज के फूल, सी आय डी असोत की मी. अँड मिसेस ५५ आरपार असोत की प्यासा. त्यांच्या प्रत्येक चित्रपटात आणि चित्रपटातील प्रत्येक दृश्यात कलात्मकता दिसून येते. चित्रपट कलात्मक असूनही त्यांच्या चित्रपटांना प्रेक्षकांची पहिली पसंती मिळत असे म्हणूनच त्यांना कलात्मकता आणि व्यावसायिकता यांच्यात सुवर्णमध्य साधणारा संवेदनशील निर्माता दिग्दर्शक म्हंटले जाते. वर उल्लेख केलेले सर्व चित्रपट हिंदी चित्रपट सृष्टीतील माईल स्टोन चित्रपट आहेत.

आजही फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट मध्ये शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना हे चित्रपट आवर्जून दाखवले जातात. त्यांच्या प्रत्येक चित्रपटाला समीक्षकांची तर पसंती मिळालीच पण प्रेक्षकांनी ही चित्रपट डोक्यावर घेतले. साहिब बिबी और गुलाम या चित्रपटाला तर राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. आजही ती तितकीच लोकप्रिय आहेत मग ती बाजी चित्रपटातील आज की रात पिया दिल ना तोडो... जाल मधील ये रात ये चांदणी फिर कहा.... आरपार मधील बाबूजी धीरे चलना..... सी आय डी मधील तर सर्वच गाणी लोकप्रिय झालीत मग ती आँखो ही आँखो मे इशारा हो गया... लेके पहला पहला प्यार... ये दिल है मुश्कील जिना यहा... मी अँड मिसेस ५५ मधील थंडी हवाये काली घटाये.... प्यासा मधील जाने वो कैसे लोग थे... कागज के फूल मधील वक्त ने किया क्या हसी सितम... चौदहवी का चांद मधील चौदहवी का चांद हो या आफताब हो.. साहिब बिबी और गुलाम मधील ना जाओ सय्या छुडाके बैया..... त्यांच्या चित्रपटातील सर्व गाणी सुमधुर होती म्हणूनच ती गाणी लोकप्रिय ठरली. केवळ गाणीच नाही तर त्यांच्या चित्रपटातील संवादही लोकप्रिय झाले. गुरुदत्त यांच्यावर बंगाली साहित्य आणि विचारांचा मोठा प्रभाव होता हाच प्रभाव त्यांच्या चित्रपटातूनही दिसून येतो.

९ जुलै १९२५ रोजी बंगलोर येथे त्यांचा जन्म झाला त्यांचे खरे नाव वसंत शिवकुमार पदुकोण असे होते. जन्म जरी बंगलोर येथे झाला तरी त्यांचे बालपण पश्चिम बंगालमधील भवानीपूर येथे गेले. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांनी मॅट्रिक



पर्यंतच शिक्षण घेतले. नंतर ते पुण्यात आले. तिथे प्रसिद्ध फिल्म कंपनी प्रभात मध्ये त्यांना असिस्टंट दिग्दर्शक व नृत्य दिग्दर्शक म्हणून नोकरी मिळाली. तिथेच त्यांची ओळख देव आनंद यांच्यासोबत झाली ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले आणि पुढे ही मैत्री इतकी घट्ट झाली की दोघांनीही एकमेकांना आपल्या चित्रपटात संधी दिली. देव आनंद यांच्या बाजी आणि जाल या चित्रपटाचे दिग्दर्शन गुरुदत्त यांनी केले तर गुरुदत्त यांनी निर्माण केलेल्या सी आय डी या चित्रपटात देव आनंद हे नायक होते .

गुरुदत्त हे एक महान चित्रपट कर्मी होते त्यासोबतच ते एक माणूस ही होते. इतर माणसांप्रमाणे त्यांच्यातही गुणदोष होते. बाजी या चित्रपटाच्या सेटवर गुरुदत्त यांची गीता रॉय या बंगाली अभिनेत्रीशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. त्यांना तीन मुलेही झाली पण दोघांचे एकमेकांशी पटले नाही दोघात किरकोळ कारणांमुळे वाद होऊ लागला.

दररोज होणारा वाद टाळण्यासाठी गीता रॉय मुलांना घेऊन घराबाहेर पडल्या, वेगळ्या राहू लागल्या याच दरम्यान गुरुदत्त हे वहिदा रहेमान यांच्या जवळ गेल्याचे बोलले गेले मात्र वहिदाजींना आपले करियर करायचे असल्याने त्या या नात्यात अडकल्या नाहीत. या सर्व कारणांनी गुरुदत्त कमालीच्या डिप्रेशनमध्ये गेले आणि तो काळा दिवस उजाडला. ९ ऑक्टोबर १९६४ रोजी पत्नी गीता रॉय मुलांसह त्यांना भेटायला येणार होत्या मात्र त्या आल्या नाहीत त्यामुळे चिडलेल्या गुरुदत्त यांनी रागाचा भरात झोपेच्या गोळ्या खाल्ल्या. त्यांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आले पण दुसऱ्याच दिवशी म्हणजे १० ऑक्टोबर १९६४ रोजी त्यांची प्राणज्योत माळवली.

अवघ्या ३९ वर्षाचे आयुष्य त्यांना लाभले. त्यांच्या निधनानंतर प्रख्यात शायर कैफी आझमी यांनी लिहिलंय

**रहनेको सदा दहरमे आता नही कोई**
**तुम जैसे गये वैसे जाता नहीं कोई**
**एक बार तो मौत भी घबरा गई होगी**
**यू मौत को सिने से लगाता नहीं कोई**

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# आपल्या भावना एवढ्या बोथट का झाल्या ?

मुंबईची लाईफ लाइन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकल ट्रेनमध्ये गेल्याच महिन्यात एका २२ वर्षीय युवकाची लाईफ लाइन कायमची तुटली. धावत्या ट्रेनमध्ये झालेल्या क्षुल्लक वादातून एक नराधमाने मयंक लोहार नावाच्या तरुणाची पोटात चाकू खुपसून निर्घृण हत्या केली. ही घटना घडत असताना ट्रेनमध्ये अनेक प्रवासी उपस्थित होते. त्यापैकी काहींनी या घटनेचे फोटो काढले तर काहींनी व्हिडीओ बनवले; मात्र कोणीच मयंकच्या मदतीला धावून गेले नाही.

फोटो आणि व्हिडीओ काढणाऱ्यांनी आपापले मोबाईल खिशात ठेवून संघटितपणे मारेकऱ्याला वेळीच पकडले असते तर कदाचित मयंक वाचलाही असता. मयंकचा खून करून आरोपी बिनधास्त उतरून चालत स्टेशनबाहेर पडला. त्याला शोधण्यासाठी समस्त रेल्वे आणि शहर पोलीस यंत्रणा कामाला लागली. तो जात असताना पाठीमागून त्याच्यावर झडप घालण्याचीही कोणाची हिम्मत झाली नाही. आज पुन्हा एकदा रेल्वे स्टेशन परिसरातील एक व्हिडीओ सोशल मीडियावर पाहण्यात आला. मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वे मार्गावरील सर्वात गजबजलेल्या दादर स्टेशनवरील हा व्हिडीओ आहे. या व्हिडिओत रेल्वे रुलनजीक एक इसम एका महिलेला निर्दयपणे मारहाण करताना दिसतो आहे. यावेळी रेल्वे स्थानकावर अनेक जण या घटनेकडे पाहताना दिसत आहेत; मात्र कोणीही तिच्या मदतीला धावले नाही.

पहिल्या घटनेत गुन्हेगाराच्या हातात सुरा होता मात्र या दुसऱ्या घटनेत मारहाण करणाऱ्या इसमाच्या हाती कोणतेही शस्त्र नसताना कोणीही त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला नाही, उलट या घटनेचा व्हिडीओ काढून तो सोशल मीडियावर व्हायरल केला. हा व्हिडीओ केव्हाचा आहे, मारहाण करणारा इसम कोण आहे याचा पोलीस शोध घेत आहेत; मात्र या दोन्ही घटनेतून मुंबईकरांची भावनाशून्यता प्रकर्षाने दिसून आली. आपल्या डोळ्यासमोर कुणाचा तरी जीव जात असताना, एका अबला असाहाय्यतेने विव्हळत असताना त्यांच्या मदतीला धावून जाण्याची कोणालाच का बरे इच्छा झाली नाही. लोकांच्या भावना इतक्या बोथट झाल्या आहेत का ?

या दोन्ही घटना पाहता २०२३ च्या दिल्लीतील दोन घटनांची प्रकर्षाने आठवण झाली. पियुष पाल नावाचा एक ३० वर्षीय युवक नेहमीप्रमाणे दिल्लीतील आऊटर रिंग रस्त्याने मोटारसायकल वरून जात असताना मागून येणाऱ्या बाईकचा धक्का लागल्याने खाली पडून जखमी झाला. डोक्याला आणि चेहऱ्याला मार लागून गंभीर जखमी झालेला पियुष लोकांकडे मदतीसाठी याचना करू लागला मात्र कोणीच त्याच्या मदतीला पुढे आले नाही. उलट काहीजण त्याचा व्हिडीओ बनवत राहिले. त्याच्या असहायतेचा गैरफायदा घेऊन चोरट्यांनी त्याचा लॅपटॉप आणि मोबाईल चोरला, चोराने पियुषचा मोबाईल हिसकावला तेव्हा पीयूषच्या घरातून त्याच्यासाठी फोन आला होता मात्र चोरट्याने तो कट केला आणि मोबाईल स्विच ऑफ करून तिथून पळ काढला. त्यावेळी तो फोन उचलला असता, तर कदाचित पीयूषच्या मदतीला त्याचे नातेवाईक धावून आले असते. मात्र स्वार्थापुढे भावना मेलेल्यांना त्याचे सोयरसुतक ते काय असणार ! अर्धा तास रस्त्यावर विव्हळत पडलेल्या पियुषला अखेर पंकज जैन नावाच्या एका इसमाने अन्य ३-४ लोकांच्या मदतीने रुग्णालयात नेले मात्र तोपर्यंत त्याची प्राणज्योत माळवली होती. मृतवत समाजाचे दर्शन घडवणारी ही दिल्लीतील दुसरी घटना. याआधी २८ मे २०२३ ला दिल्लीच्या शहाबाद डेअरी परिसरात साक्षी नावाच्या एका १६ वर्षीय मुलीची साहिल नामक तरुणाने चाकूने भोसकून आणि दगडाने ठेचून निर्घृण हत्या केली. रहदारीच्या परिसरात ही घटना घडत असताना बाजूने अनेक जण ये-जा करत होते मात्र त्यापैकी कोणीच साक्षीच्या मदतीला धावून आला नाही. यावेळी जेवढी चर्चा या हत्याकांडाची झाली तेव्हढीच चर्चा माणसातील हरवत चाललेल्या माणुसकीची झाली. साक्षी मदतीसाठी जिवाच्या आकांताने विव्हळत होती; मात्र बाजूने जाणारे लोक तिच्याकडे बघून न बघितल्यासारखे करत पुढे जात होते, हे साऱ्या देशाने सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून पाहिले. त्यापैकी २-४ जण जरी साक्षीच्या मदतीला धावून गेले असते, तरी साक्षी आज जिवंत असती. मात्र 'ती दुसऱ्याची मुलगी', 'माझी कोणीच नाही', 'मी का तिच्या मदतीला जाऊ', 'इतरही आजूबाजूला लोक आहेत ते जात नाहीत, तर मी का जाऊ ?' 'मी पुढे गेलोच तर उद्या पोलीस मला त्रास देतील, कोर्टाच्या चकरा माराव्या लागतील त्यापेक्षा त्याकडे दुर्लक्ष केलेलेच बरे.' या वैचारिक वादळातून त्यावेळी आजूबाजूने जाणारे अनेक जण गेले असतील, पण त्यांच्या या विचारांच्या रणकंदनावर त्यांच्यातील विवेकाला मात करताच आली नाही. साक्षीच्या जागी माझी मुलगी, माझी बहीण असती, तरी मी असाच दुर्लक्ष करून पुढे गेलो असतो का, असा विचार त्यावेळी कोणाच्याच मनाला शिवला नाही परिणामी भर रस्त्यात साक्षीचा नाहक खून झाला या खुनाला हे बघेही जबाबदार आहेत असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. अशा घटना केवळ दिल्ली आणि मुंबईत घडतात असे नव्हे प्रत्येक शहरात, प्रत्येक नगरात हीच स्थिती आहे.

मी भला आणि माझे घर भले, समाजात काही बरे वाईट घडतेय तर त्याचे मला काय ? अशी कूपमंडूक वृत्ती मानवांत तयार होऊ लागली आहे. आपणही समाजाचा एक अविभाज्य घटक आहोत, किंबहुना समाजामुळेच आपले अस्तित्व आहे. समाजस्वास्थ चांगले राहिले तरच आपले स्वास्थ चांगले राहील. आज समाजातील एखाद्या घटकाच्या मदतीला आपण धावून गेलो तर उद्या समाज आपल्या मदतीला धावून येईल. हे आपल्या केव्हा लक्षात येणार ? शालेय जीवनात 'सारे भारतीय माझे बांधव आहेत' अशी प्रतिज्ञा आपण प्रतिदिन घेतो; मात्र आपल्या बांधवांवर-भगिनींवर संकट ओढवते तेव्हा या प्रतिज्ञेचा आपल्याला विसर कसा पडतो ? भगवंताला मानवाने बुद्धी दिली आहे, मन दिले आहे, विवेकही दिला आहे, त्याचा वापर आपण केवळ आपल्या स्वार्थासाठीच करणार आहोत का ? इतरांना साहाय्य करण्याच्या गोष्टी आपण शालेय पुस्तकांत वाचल्या आहेत. गरजवंताला साहाय्य करण्याचे महत्व सांगणाऱ्या रिल्सही आपल्या मोबाईलवर पाहिल्या आहेत; मात्र जेव्हा एखाद्या अनोळखी असह्हायत्याला मदत करण्याचा प्रसंगओढवतो, तेव्हाच आपल्यातील माणुसकीची खरी कसोटी लागते.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

### ते तडे

पहिल्यांच पावसांत
पुलाला पडलेले तडे
गरमागरम हा विषय
ब्रेकिंग न्यूज तडतडे

कॅमेरे फिरे भिर भिरे
उडू लागलेत तुडतुडे
असूद्यालहानशी रेष
दाखवा बडे भगदाडे

अफवाएक्स्प्रेसवेवर
धावी जिकडे तिकडे
कोणपाहे तपासून रे
फुगवून सांग आकडे

ए आय आहेचंसाथी
खड्डे पडले हे केवढे
विरोधी आक्रोश सुरु
लक्ष नाही कसे एवढे


जीव मुठीत अस्वस्थ
प्रवास करणारे गधडे
तशाचं रेटतातगाड्या
कधीचं ना घेणार धडे

उद्घाटन झाले घाईत
आता न दावी मुखडे
समोर येईना ते कुणी
कोण ऐकणारं दुखडे

**हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# शरद पवार नेमके काय करत आहेत ? कोणता झेंडा हाती घेणारं ? सस्पेन्स वाढला

काही दिवसापूर्वी पश्चिम बंगालमधील खासदारांनी ममता बॅनर्जी यांना सोडचिठ्ठी देवून राष्ट्रीय लोकशाही आघाडीला पाठिंबा दिला. त्यानंतर महाराष्ट्रातील शिवसेना ठाकरे गटाचे सहा खासदार फुटून शिंदे सेनेत दाखल झाले हि घटना शांत होते न होते. तोपर्यंत भारतीय राजकारणातील बडे नेते आणि महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचा प्रमुख पक्ष असलेला शरद पवारांचा राष्ट्रवादी एनडीएसोबत घरोबा करण्यासाठी हालचाली गतिमान केल्याचे समोर आले आहे. नुकताच राष्ट्रवादीचे नेते, आमदार जयंत पाटील आणि अमित शहांचे अत्यंत विश्वासू आणि भाजपाचे खासदार विनोद तावडे यांची मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये मॅरेथॉन गुप्त बैठक झाल्याचे वृत्त आहे. त्यामुळे



आणखीनच या बातमीची सनसनाटी निर्माण झाली आहे. या साऱ्या हालचालीमुळे शरद पवार नेमके काय करत आहेत अथवा ते कुठे जाणारं आहेत. याचा अंदाज कोणालाच बांधता येईना त्यामुळे सस्पेन्स वाढला असून शरद पवारांची हि गुगली अनेकांना संभ्रम करायला लावणारी आहे काही दिवसापूर्वी ते काँग्रेसमध्ये राष्ट्रवादी पक्ष विलीनीकरण करणारं असल्याचे बोलले जात होते त्यानंतर आता हि हालचाल उचल खाल्ली आहे. त्यामुळे ते नेमके कोणत्या पक्षाला पाठींबा देणार ? याचे पत्ते अद्याप ओपन झालेले नाहित विरोधात असल्यामुळे प्रश्न सुटत नाहीत, विकास कामांसाठी निधी मिळत नाही त्यामुळे जनतेला उत्तर देताना अडचण येते अशी कारणे येतं असल्यामुळे आणि पक्ष फुटू नये यासाठीच सत्तेसोबत जाण्यासाठी शरद पवारांच्या आमदार, खासदारांना वेध लागले आहे. त्यामुळे आगामी काळात शरद पवारांचा हा खेळ कुणाच्या पथ्यावर पडतो ते पहाणे मोठे रंजक ठरणारं आहे.

**– राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## ‘कपास क्रांती अभियान’ अंतर्गत कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, पोंभूर्णा (चंद्रपूर) :** केंद्र पुरस्कृत कापूस उत्पादकता वाढ (कपास क्रांती) अभियान २०२६-२७ अंतर्गत कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पादनात व उत्पादकतेत वाढ करण्याच्या उद्देशाने मौजा देवई येथे शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. प्रशिक्षणात कृषी विज्ञान केंद्र, सिंदेवाही येथील शास्त्रज्ञ शिडाम साहेब यांनी कापूस पिकातील आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब, एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन, संतुलित खत व्यवस्थापन, कार्यक्षम पाणी व्यवस्थापन, तण व्यवस्थापन, कमीत कमी रासायनिक घटकांचा वापर करून सेंद्रिय घटकांचा अधिकाधिक समावेश, तसेच लागवडीपासून वेचणीपर्यंतच्या शास्त्रशुद्ध पीक व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून उत्पादन खर्च कमी करत गुणवत्तापूर्ण व अधिक उत्पादन घेण्याचे आवाहन त्यांनी शेतकऱ्यांना केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी श्रीमती स्वाती ढोबळे यांनी केले. तालुक्यात कापसाचे क्षेत्र सुमारे २५ ते ३० टक्के असले, तरी उत्पादकता अपेक्षेपेक्षा कमी असल्याचे त्यांनी नमूद केले. कपास क्रांती अभियानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अद्ययावत तंत्रज्ञानाची माहिती, शास्त्रशुद्ध पीक व्यवस्थापन आणि उत्पादनवाढीसाठी आवश्यक मार्गदर्शन सातत्याने उपलब्ध करून दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मंडळ कृषी अधिकारी गणेश गवळी यांनी कपास क्रांती अभियानाची उद्दिष्टे, विविध उपक्रम तसेच शेतकऱ्यांनी अवलंबावयाच्या तांत्रिक बाबींची सविस्तर माहिती दिली. या प्रशिक्षण कार्यक्रमास कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी, ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, प्रगतशील शेतकरी तसेच परिसरातील मोठ्या संख्येने कापूस उत्पादक शेतकरी उपस्थित होते. या प्रशिक्षणाद्वारे शेतकऱ्यांना आधुनिक, शाश्वत व शास्त्रशुद्ध शेती पद्धतींचा अवलंब करून कापूस उत्पादन आणि उत्पादकता वाढविण्यासाठी उपयुक्त मार्गदर्शन करण्यात आले. व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## सेवा, सुशासन, गरीब कल्याणाच्या १२ वर्षांनिमित्त भाजपा पोंभूर्णा तालुक्याचा स्वच्छता अभियान उपक्रम




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, पोंभूर्णा (चंद्रपूर) :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणाची १२ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टी, पोंभूर्णा तालुक्याच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानामध्ये कार्यकर्त्यांनी सार्वजनिक ठिकाणे, परिसर आणि महत्त्वाच्या स्थळांची स्वच्छता करून स्वच्छ भारत अभियानाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविला. स्वच्छता ही केवळ एक मोहीम नसून ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, असा संदेश यावेळी देण्यात आला. यावेळी भाजपा तालुका अध्यक्ष हरीश ढवस यांनी सांगितले की, मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेतून देशभरात स्वच्छतेबाबत मोठी जनजागृती झाली असून स्वच्छ, सुंदर आणि विकसित भारत घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने योगदान देणे आवश्यक आहे. लोकनेते आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हाध्यक्ष हरीशभैय्या शर्मा यांच्या नेतृत्वात तालुक्यात विविध सेवा उपक्रम राबविले जात असून, त्याचाच एक भाग म्हणून हे स्वच्छता अभियान उत्साहात पार पडले. या उपक्रमात भाजपा पदाधिकारी, महिला मोर्चा तसेच अनेक कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

## झाडाच्या अडकलेल्या बुंध्यामुळे बंधाऱ्याला धोका
### बुंधे हटवून सुरक्षितता जपण्याची मागणी




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, उंब्रज (सातारा) :** कळंत्रेवाडी (ता.कराड) येथील उत्तरमांड नदीवरील बंधाऱ्यात पुराच्या पाण्यासोबत वाहून आलेला महाकाय झाडाचा बुंधा अडकून पडल्याने बंधाऱ्याच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. हा बुंधा दीर्घकाळ तसाच राहिल्यास पाण्याच्या प्रवाहावर परिणाम होऊन बंधाऱ्याच्या भिंतीवर अतिरिक्त दाब निर्माण होण्याची शक्यता असून भविष्यात नुकसान होण्याचा धोका नाकारता येत नाही. सध्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नदीपात्रातील पाण्याचा वेग वाढत असल्याने अशा अडथळ्यांमुळे पूरस्थिती अधिक गंभीर होऊ शकते.

त्यामुळे पाटबंधारे विभागाने उत्तरमांड धरण परिसरापासून उंब्रजपर्यंतच्या सर्व बंधाऱ्यांची तातडीने पाहणी करून ज्या ठिकाणी झाडांचे मोठे बुंधे, फांद्या किंवा इतर अडथळे अडकले आहेत, ते त्वरित हटवावेत, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांकडून होत आहे. वेळीच उपाययोजना केल्यास बंधाऱ्यांचे संभाव्य नुकसान टाळता येईल आणि पावसाळ्यात कोणतीही अप्रिय घटना घडण्याची शक्यता कमी होईल. त्यामुळे पाटबंधारे विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# शिक्षकांसोबत दुजाभाव का?



**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.०८, मुंबई :** संपूर्ण महाराष्ट्र राज्यात निवडणूक आयोगाने मतदार यादी सूक्ष्म नोंदी सर्व्हेक्षण कार्यक्रम सुरु केला असून या कामासाठी विविध खात्यातील कर्मचाऱ्यां सोबतच सरकारी शाळांचे अर्थातच महापालिका आणि जिल्हा परिषदेच्या शिक्षकांना हे डखठ चे काम करण्यासाठी आदेशीत केले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अख्त्यारितील सर्व खात्यातील वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांना हे डखठ चे काम करणे बंधनकारक केले आहे.गेल्या एप्रिल म हिन्यात ऐन वार्षिक परीक्षेचे पेपर सुरु असताना मनपा च्या शिक्षकांना इडज म्हणून पूर्णवेळ काम करण्याचे आदेश दिले होते.

यावेळी या कामाला सुद्धा शिक्षक संघटनांनी प्रखर विरोध केला होता. शिक्षकांनी रोटेशन पद्धतीने हे काम शालेय स्तरावरून करावे असे वरिष्ठानी सांगितले होते. परंतु प्रत्यक्षात असे काहीही झाले नाही.

१५ जूनला नवीन शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर अनेक वर्गांवर शिक्षक नाहीत. जे शिक्षक शाळेत आहेत त्यांच्यावर BLO ड्युटी करणाऱ्या शिक्षकांच्या वर्गाचा अतिरिक्त भार दिलेला आहे. काही काही शाळामध्ये एकच शिक्षक आणि चार वर्ग तर काही ठिकाणी दोन शिक्षक आणि आठ आठ वर्ग आहेत. यात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे कोणालाच दिसत नाही का?

SIR कामासाठी नेमलेल्या शिक्षकांनी अनेकवेळा आम्हाला आमच्या विद्यार्थ्यांना शिकवू द्या, म्हणून विनंती केली पण शिक्षकांचे कोणी ऐकून घ्यायलाच तयार नाही. त्यात हे शिक्षक कसेतरी डखठ चे काम करायला तयार झाले तर त्यातही आता शिक्षकांनी चार दिवस शाळेत शिकवण्याचे काम करून शुक्रवार, शनिवार आणि रविवारी सुद्धा डखठ चे काम करावे.असे व्हरच्युअल मिटिंग मध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सूचित केले आहे. मनपा चे बहुतांश शिक्षक हे कर्जत, बदलापूर, अंबरनाथ, आसनगाव, टिटवाळा, पनवेल अशा दूरच्या भागातून येणारे आहेत. त्यातल्या अनेक महिला शिक्षिकांना लहान लहान मुले आहेत, काही च्या घरी वयोवृद्ध आई वडील किंवा सासुसासरे आहेत. काहींची मुले पाळणा घरात ठेवले जातात.

SIR ची ड्युटी करून या सर्वांची काळजी /देखरेख कधी आणि कशी करायची?

शिक्षकांना एकतर पूर्णवेळ शाळेत पाठवा किंवा पूर्णवेळ डखठ चे काम करू द्या. असा एकमुखी सुर शिक्षकांमधून निघत आहे.

जर दोन्ही कामे करून घ्यायची आहेत तर शिक्षकांना रविवारी सुट्टीच्या दिवशी का कामावर पाठवता?

आठवडाभर काम करून शिक्षकांना थकवा येणार नाही का?

त्यांना एक दिवस आराम नको का?

शिक्षक माणूस नाही का?

त्यांना सुख दुःख नाही का?

त्यांच्या हक्काच्या सुट्टीचे काय?

या सर्व प्रश्नांची उत्तरे कोण देणार?

मनपा च्या इतर खात्यातील कर्मचाऱ्यांना पूर्णवेळ SIR चे काम आहे तर शिक्षकांनीच काय पाप केले?

जो न्याय इतर खात्याच्या कर्मचाऱ्यांना तोच न्याय शिक्षकांना काय नाही?

शिक्षकां सोबतच असा दुजाभाव का?

# जंगम मठाच्या जागेबाबत अन्यायाचा प्रयत्न
## वीरशैव समाजाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**अक्षरात : विश्वास नायगांवकर**

**दि.०८, तुळजापूर (धाराशिव) :** तुळजापूर येथील वीरशैव समाजाच्या जंगम मठाच्या मालकीच्या जागेबाबत जाणीवपूर्वक अन्याय करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत जंगम मठ ट्रस्टच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. मठाच्या म ालकीच्या जागेवर सभागृह उभारण्याची मागणी बेकायदेशीर असून अशा कोणत्याही प्रयत्नाला प्रतिबंध करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

निवेदनानुसार, तुळजापूर नगरपरिषदेच्या पाठीमागील सिटी सर्व्हे क्रमांक ९७२ ही जागा हैदराबाद इंडोमेंट रेग्युलेशन ॲक्ट १३४९ फसलीनुसार नोंदणीकृत धार्मिक संस्थेची मालम त्ता आहे. १९६२ मध्ये शासनाने तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली जंगम मठ ट्रस्टची स्थापना केली. या जागेतील ७३१ चौरस मीटर क्षेत्रावर नगरपरिषदेने ५७ वर्षांपूर्वी भाजी मंडईचे आरक्षण टाकले होते. मात्र तत्कालीन तहसीलदारांनी या निर्णयास विरोध दर्शविला होता.

यानंतर नगरविकास विभागाने १९७६, १९७८ आणि १९८३ मध्ये नगरपरिषदेच्या पुढील कारवाईला स्थगिती दिली. पुढे नगरपरिषदेकडून विविध ठरावांद्वारे संबंधित आरक्षण रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि सुधारित विकास आराखड्यात ही जागा ट्रस्टच्या मालकीची कायम ठेवण्यात आली, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे. ट्रस्टने १९८४, १९८९, २०१०, २०१६ तसेच २०२४ आणि २०२५ मध्ये नगरपरिषदेकडून बांधकाम परवानग्या घेऊन विविध बांधकामे केली असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. मठ परिसरातील सार्वजनिक शौचालयासाठी १९८९ मध्ये ट्रस्टने सामाजिक हित लक्षात घेऊन जागा उपलब्ध करून दिली होती. मात्र सध्या ती जागा वापरात नसल्याने ट्रस्टने मंजूर बांधकाम आराखड्यात तिचा समावेश केला असून त्यासाठी नगरपरिषदेची रितसर परवानगीही घेतल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.


अपूर्ण बांधकामाचा गैरफायदा घेत त्या जागेवर सभागृह उभारण्याची मागणी होत असल्याची माहिती मिळाल्याचा दावा ट्रस्टने केला आहे. धार्मिक संस्थेच्या मालकीच्या जागेवर अशा प्रकारचे बांधकाम करणे कायद्याच्या विरोधात असल्याचे सांगत, या संदर्भात सोशल मीडियातून आणि वर्तमानपत्रांमधून चुकीची माहिती प्रसारित करून अपप्रचार केला जात असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. ट्रस्टच्या वतीने या जागेवर महादेव मंदिर, सभामंडप, शैक्षणिक उपक्रम आणि धर्मशाळेचे काम सुरू असून नगरपरिषदेला स्वतंत्र सभागृह उभारण्याची आवश्यकता नसल्याचे नमूद करत, मठाच्या मालकी हक्काचे संरक्षण करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

# जन आरोग्य समितीच्या पहिल्याच बैठकीत तुंगत आरोग्य व्यवस्थेतील त्रुटींवर थेट चर्चा
## रुग्णांना सन्मानाची वागणूक द्या जि.प. सदस्या गीतांजली साळुंखे यांचे निर्देश

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०८, पंढरपूर :** अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर तुंगत प्राथमिक आरोग्य केंद्राची आरोग्य यंत्रणा सज्ज करण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात आली आहेत. तुंगत प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत जन आरोग्य समितीची पहिली बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद सदस्या सौ. गीतांजली साळुंखे होत्या. यावेळी त्यांनी यात्रेच्या काळात आरोग्य सेवा अधिक सक्षम, तत्पर आणि लोकाभिमुख करण्यासाठी वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्पष्ट आणि ठोस सूचना दिल्या. अध्यक्षीय भाषणात साळुंखे म्हणाल्या, आरोग्य केंद्रात येणारा प्रत्येक रुग्ण हा आपला पाहुणा आहे. त्याला सन्मानाची, आपुलकीची आणि तत्पर सेवा मिळाली पाहिजे. यात्रेकरूंसह स्थानिक नागरिकांचा आरोग्य केंद्रावरील विश्वास अधिक दृढ करण्यासाठी ओपीडी सेवा वाढविण्यावर भर द्यावा. त्यांनी आरोग्य केंद्रातील विविध अडचणींबाबतही प्रशासनाला आश्वस्त करत सांगितले की, निधी किंवा इतर कोणतीही समस्या असल्यास ती आमच्या निदर्शनास आणून द्यावी. जिल्हा परिषद स्तरावरून त्याचा तातडीने पाठपुरावा करून आवश्यक ती मदत उपलब्ध करून देण्यात येईल.बैठकीस तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. एकनाथ बोधले प्रमुख उपस्थित होते. त्यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांना शिस्त, वेळेचे काटेकोर पालन आणि जबाबदारीने काम करण्याचे आदेश देताना स्पष्ट शब्दांत इशारा दिला. कामात कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. वेळेचे बंधन पाळले नाही तर संबंधितांवर नाईलाजाने प्रशासकीय कारवाई करावी लागेल, असे त्यांनी ठामपणे सांगितले. डॉ.बोधले यांनी सध्या आरोग्य केंद्राला अपुरा निधी मिळत असल्याने काही मूलभूत सुविधा व सेवा पुरविताना अडचणी निर्माण होत असल्याची वस्तुस्थितीही मांडली. मात्र उपलब्ध संसाधनांमध्ये अधिकाधिक चांगली सेवा देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीदरम्यान जन आरोग्य समितीच्या सदस्यांनी आरोग्य केंद्रातील पायाभूत सुविधांपासून औषधसाठा, स्वच्छता, मनुष्यबळ आणि इतर विविध समस्यांकडे अध्यक्षांचे लक्ष वेधले.

समितीची ही पहिलीच बैठक असल्याने पुढील बैठकीपूर्वी प्राधान्याने आवश्यक सुधारणा करण्याचे आश्वासन डॉ. बोधले यांनी दिले. आषाढी यात्रेसाठी लाखो भाविक पंढरपूरकडे येणार असल्याने तुंगतसह परिसरातील आरोग्य सेवा सक्षम करण्याची गरज अधिक अधोरेखित झाली आहे. या बैठकीत झालेल्या



निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास यात्रेकरू आणि स्थानिक नागरिकांना अधिक दर्जेदार व तत्पर आरोग्य सेवा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.या बैठकीस जि.प. सदस्या शन्मुखी कोरके, पं.स. सदस्या विजया भोसले, तुंगत प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, डॉ. मेघा गावडे-भानुसे, उद्योजक अमित साळुंखे, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक विठ्ठल नाना रणदिवे, तुंगत ग्रामपंचायतीच्या सरपंच डॉ.अमृता रणदिवे, उपसरपंच प्रकाश रणदिवे, डॉ.पंकज लामकाने, नवनाथ बापू रणदिवे, शिवाजी इंगळे, ताजुद्दीन मुलाणी, वैद्यकीय अधिकारी डॉ.काजल माळी, औषध निर्माण अधिकारी लक्ष्मण साबळे, आरोग्य सहाय्यक राजेंद्र कोळेकर, आरोग्य सहाय्यक अनिल यलमार, आरोग्य सहायिका सुरेखा जवळकर, अश्विनी जगधने, अजित मुळे, संदीप कुमार राऊत आदी उपस्थित होते.

# डहाणू-जव्हार आगाराला महिन्याभरात ३० नवीन बसेस - परिवहन मंत्री सरनाईक

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०८, मुंबई :** पालघर जिल्ह्यातील डहाणू व जव्हार आगारास महिन्याभरात ३० नवीन बसेस उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच आवश्यकतेनुसार भविष्यात आणखी बसेसही उपलब्ध करून दिल्या जातील, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानपरिषदेत दिली.विधानपरिषदेत सदस्य निरंजन डावखरे यांनी डहाणू व जव्हार आगारासाठी सुस्थितीतील बसेस उपलब्ध करून देण्याबाबत, तर सदस्य प्रवीण दरेकर यांनी राज्यातील एसटी बस अपघातांमध्ये वाढ झाल्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. या चर्चेत सदस्य प्रवीण दरेकर, बच्चू कडू व अनिकेत तटकरे यांनी सहभाग घेतला. परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, दुर्गम, आदिवासी डोंगराळ भागातही एसटी सेवा पोहोचविण्याचे शासनाचे धोरण असून, या भागांमध्ये अखंड सेवा देण्यासाठी बस ताफ्याचे आधुनिकीकरण सुरू आहे. मागील ७ -८ वर्षांत नवीन बसेसची खरेदी कमी झाली होती. इलेक्ट्रिक बस उपलब्ध होण्यात विलंब झाल्याने शासनाने पुन्हा डिझेल बसेस खरेदीचा निर्णय घेतला. आतापर्यंत २,६४० डिझेल बसेस खरेदी करण्यात आल्या असून टप्प्याटप्प्याने एकूण ८,३०० नवीन बसेस ताफ्यात दाखल करण्यात येत आहेत.

मंत्री सरनाईक म्हणाले की, १५ वर्षांपर्यंत बस वापरण्याची मर्यादा असल्याने जुन्या बसेसमुळे विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागात बिघाडाचे प्रमाण वाढले होते. मात्र तांत्रिक कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी त्यांच्याकडून अधिक परिणामकारक काम करून घेण्यावर भर देण्यात येणार आहे. राज्यातील बस अपघातांबाबत माहिती देताना मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, अपघात रोखण्यासाठी नवीन चालकांना ४८ ते ८० दिवसांचे प्रशिक्षण, सुरक्षित वाहनचालकतेचे विशेष प्रशिक्षण, सिम्युलेटरद्वारे प्रशिक्षण, नियमित दृष्टी तपासणी, अल्कोहोल चाचणी, तसेच सेवाकालानुसार उजळणी प्रशिक्षण देण्यात येत आहे. मंत्री सरनाईक म्हणाले की, भविष्यात बसचे आयुष्य १५ वर्षांऐवजी ८ वर्षांपर्यंत मर्यादित ठेवून टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रिक बसकडे संक्रमण करण्याचे धोरण शासनाने स्वीकारले आहे.

# जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न ५० टक्क्यांनी वाढविण्याचे उद्दिष्ट

## त्यासाठी राज्यातील पहिले 'फ्लॅगशिप प्रकल्प मॉनिटरिंग' मॉड्युल

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.०८, धाराशिव :** आगामी काळात धाराशिव जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न पन्नास टक्क्यांनी वाढविण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे. त्यासाठी जिल्ह्यातील विकासकामांना निर्धारित वेळेत अधिक गती देण्यासाठी राज्यातील पहिले 'फ्लॅगशिप प्रकल्प मॉनिटरिंग' मॉड्युल तयार करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शिक्षण, आरोग्य, रोजगार निर्मिती, पर्यटन व्यवसाय यासोबतच पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी या महत्वाच्या ४५ प्रकल्पांवर आपण लक्ष केंद्रित केले आहे. त्यातून जिल्ह्याचा कायापालट करण्यासाठी आपण प्रामाणिकपणे प्रयत्न करीत असल्याची माहिती मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात नुकताच आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. विविध प्रकल्पांच्या माध्यमातून जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न आज आहे. त्यापेक्षा ५० टक्क्यांनी वाढविण्यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत. त्यासाठी एका अनोख्या आणि प्रभावी प्रणालीच्या अंतर्गत ४५ प्रकल्पावर नोडल अधिकाऱ्यांच्या निगराणीखाली काम सुरू आहे. या ४५ प्रकल्पांचे निर्धारित वेळेत काम



पूर्ण व्हावे याकरिता ७२ भाग करण्यात आले आहेत. या प्रकल्पांच्या अंमलबजावणीदरम्यान शासन निर्णय, निधी मंजुरी, जमीन अधिग्रहण, प्रशासकीय मान्यता किंवा इतर तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास त्या कोणत्या स्तरावर प्रलंबित आहेत. याचे विश्लेषण करून त्या तातडीने सोडविण्यासाठी आवश्यक समन्वय ही साधला जातो. ज्या अडचणी नोडल अधिकाऱ्यांच्या स्तरावर मार्गी लागत नाहीत, त्या जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून पुढे पाठपुरावा करून निकाली काढल्या जातात. आवश्यकतेनुसार विभागीय आयुक्त स्तरावर ही पाठपुरावा केला जातो.

मंत्रालयीन स्तरावरील प्रलंबित बाबी मार्गी लावण्यासाठी माननीय मुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीकर परदेशी यांची नियुक्ती करण्यात आली असून, ते विविध विभागांशी समन्वय साधून मंजुरी प्रक्रिया गतीमान करण्यासाठी सहकार्य करत असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

या संपूर्ण प्रक्रियेवर पालक सचिव सातत्याने देखरेख ठेवत असून, वेळोवेळी आढावा बैठका घेऊन महत्त्वाच्या विषयांना गती देत आहेत. तसेच आपण स्वतः नियमित बैठका घेऊन प्रत्येक प्रकल्पाचा आढावा घेत आहेत. अडचणीच्या ठिकाणी स्वतः पाठपुरावा करत असून, विषयनिहाय स्वीय सहायकांची नियुक्ती करून विविध प्रकल्पांच्या प्रगतीवर स्वतंत्रपणे लक्ष ठेवण्यात येत आहे.

प्रकल्प व्यवस्थापन अधिक प्रभावी, गतिमान आणि पारदर्शक करण्यासाठी आसना या जागतिक स्तरावर वापरल्या जाणाऱ्या प्रकल्प व्यवस्थापन सॉफ्टवेअरचा अवलंब करण्यात आला आहे. अनेक नामांकित कंपन्या तसेच मित्र संस्थेद्वारे ही या सॉफ्टवेअरचा सध्या वापर केला जात आहे.

जिल्ह्यातील संबंधित अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून, अनेक अधिकारी सध्या या प्रणालीद्वारे प्रकल्पांचे मॉनिटरिंग करत आहेत. यामुळे प्रत्येक प्रकल्पाची सद्यस्थिती, प्रलंबित बाबी, जबाबदाऱ्या आणि पाठपुराव्याची माहिती एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर उपलब्ध होत असून, निर्णय प्रक्रिया अधिक वेगवान, अचूक आणि परिणामकारक होणार असून या अभिनव मॉड्युलमुळे जिल्ह्यातील महत्त्वाच्या विकासकामांना निश्चितच गती मिळेल आणि धाराशिवच्या सर्वांगीण विकासाला नवे बळ मिळेल, असा विश्वासही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

**या प्रकल्पांवर विशेष लक्ष : आमदार राणाजगजितसिंह पाटील**

तुळजाभवानी मंदिर विकास आराखडा, मंदिर विकास, जमीन अधिग्रहण, १०८ फूट मूर्ती, भक्त सुविधा केंद्र, रामदरा तलाव सुशोभीकरण यासह शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, ५०० खाटांचे नवीन शासकीय रुग्णालय, शेतकरी बांधवांसाठी महत्त्वपूर्ण असणारा तारा प्रकल्प, धाराशिव – तुळजापूर – सोलापूर रेल्वे प्रकल्प, कृष्णा–मराठवाडा सिंचन प्रकल्प, माळुंब्रा येथील विमानतळ धावपट्टी विकास, कौडगाव रोजगार निर्मिती प्रकल्प, नळदुर्ग–होर्टी चखूउ साठी जमीन अधिग्रहण प्रक्रिया यासह जिल्ह्यातील इतर विविध पायाभूत सुविधा, सिंचन, आरोग्य, उद्योग व पर्यटन विकासाशी संबंधित महत्त्वाच्या प्रकल्पांवर सध्या विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील विकासकामांचा वेग वाढविण्यासाठी, विविध विभागांमध्ये अधिक प्रभावी समन्वय निर्माण करण्यासाठी आणि प्रत्येक महत्त्वाकांक्षी प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी तयार करण्यात आलेले फ्लॅगशिप प्रकल्प मॉनिटरिंग – धाराशिव जिल्हा पॅटर्न हे मॉड्युल राज्यासाठी एक आदर्श ठरेल, असा विश्वासही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला जात आहे.

---

# विविध मागण्यांसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेचा पारनेर तहसीलवर मोर्चा

## 'सरसकट कर्जमाफी द्या, स्मार्ट मीटर हठवा'

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकप) आणि किसान सभेच्या वतीने सरसकट शेतकरी कर्जमाफी, स्मार्ट मीटर योजना रद्द करणे, मनरेगा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, प्राथमिक शाळा सुरू ठेवणे तसेच इतर विविध मागण्यांसाठी नुकताच पारनेर तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

पारनेर शहरातील लाल चौकातून घोषणाबाजी करत मोर्चाला सुरुवात झाली. शिवाजी रोडमार्गे तहसील कार्यालयावर पोहचल्यानंतर मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. मोर्चाला संबोधित करताना भाकप तालुका सचिव कॉ. संतोष खोडदे यांनी शासनाने जाहीर केलेली कर्जमाफी योजना ही त्यांनी केलेल्या घोषणेला हरताळ फासणारी आहे. सरसकट कर्जमाफी करण्याऐवजी अटी व शर्ती लादून अनेक शेतकऱ्यांना या कर्जमाफीतून वगळण्यात आले आहे. ही कर्जमाफी योजना नसून कर्ज वसुली योजना आहे म्हणून शासनाने घोषित केल्याप्रमाणे सर्व शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करून त्यांचा सातबारा कोरा करावा अशी मागणी केली

किसान सभेचे तालुकाध्यक्ष कॉ. सुभाष ठुबे यांनी शासनाचे स्पष्ट आदेश असूनही वीज वितरण कंपनीकडून घर मालकाची परवानगी न घेता परस्पर स्मार्ट मीटर बसवत आहेत. हे स्मार्ट मीटर वीज ग्राहकांची लूट करणारे आहेत. घर मालकाच्या परवानगीशिवाय हे स्मार्ट मीटर बसू नयेत. ग्राहकाने मागणी केल्यास त्याला त्याचे जुने मीटर बसून द्यावेत व ही स्मार्ट मीटरची योजना तात्काळ बंद करण्याची मागणी केली. तालुका सहसचिव कॉ. कैलास शेळके यांनी केंद्र शासनाने मनरेगा कायद्या ऐवजी आणलेला व्हीबीग्रामजी कायदा हा आर्थिक बोजा राज्य सरकारवर टाकणारा असून हा



कायदा रद्द करून जुना मनरेगा कायदा सुधारणांसह पुन्हा अंमलात आणावा तसेच विद्याथ पटसंखेचे कारण दाखवून जिल्हा परिषदेच्या शाळा बंद करू नयेत, शेतकऱ्यांच्या कांद्याला हमीभाव देण्यात यावा व कांद्याची निर्यात खुली ठेवण्यात यावी, अशी मागणी केली.

याप्रसंगी कॉ.बबनराव बालके, संतोष खोडदे, सुभाष ठुबे, माऊली करंजुले, जयसिंगराव गायकवाड, बबनराव रावडे, सागर व्यवहारे, हेमंत पाटील, बापू गायकवाड, संजय जाधव, हरिभाऊ गायकवाड, किरण खामकर, संजय भगत, नानाभाऊ खामकर, सुरेश होले, चंदकांत चौधरी,संपत रावडे, दादाभाऊ शिंदे,सुदाम गायकवाड, अण्णासाहेब शिंदे, अंकुश गायकवाड, नामदेव ठुबे, बबन दिवटे, सुलाबाई आदमाने,मैनावती दिवेकर, रखमाबाई शेळके,भागुबाई मुंगसे, छाया ठुबे, निर्मला खोडदे यांच्यासह पक्षाचे कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोर्चाचे निवेदन तहसीलदार गायत्री सौंदाणे यांना देण्यात आले.

---

# सोयगावच्या साप्ताहिक बाजाराची दैना; नगरपंचायतीच्या दुर्लक्षामुळे व्यापारी, शेतकरी आणि ग्राहक संतप्त

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** दिनांक ०७ जुलै रोजी सकाळी झालेल्या रिमझिम पावसाने सोयगाव येथील साप्ताहिक बाजाराची अक्षरशः दाणादाण उडवली. बाजार परिसरात सर्वत्र चिखल, साचलेले पाणी आणि दुर्गंधीमुळे व्यापारी, शेतकरी, महिला ग्राहक व नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. अनेक ठिकाणी भाजीपाला आणि फळे पाण्यात भिजून खराब झाली, तर काही महिला ग्राहक चिखलात घसरल्याच्या घटना ही घडल्या.

व्यापाऱ्यांनी सांगितले की, दर आठवड्याला बाजार शुल्क (कमिटी) नियमित भरूनही नगरपंचायतीकडून कोणत्याही मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाहीत. बाजारात कायमस्वरूपी शेड नाही, सिमेंटचे चबुतरे नाहीत, पावसाच्या पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था नाही, स्वच्छतेचा अभाव आहे आणि पिण्याच्या पाण्याची सुविधाही अत्यंत निकृष्ट अवस्थेत आहे. त्यामुळे प्रत्येक पावसाळ्यात व्यापाऱ्यांना



लाखो रुपयांचे नुकसान सहन करावे लागते.

बाहेरगावाहून येणाऱ्या व्यापाऱ्यांनीही तीव्र नाराजी व्यक्त करत सांगितले की, आम्ही शेंदुर्णी, पहूर, वाकोद, फरदापूर, तोंडापूर, अजिंठा यांसारख्या ठिकाणी बाजार भरवतो. तेथे बाजार परिसर स्वच्छ, नियोजनबद्ध असून शेड, पाणी व इतर सुविधा उपलब्ध असतात.

त्यामुळे कमिटी देताना कोणतीही अडचण वाटत नाही. मात्र सोयगावचा बाजार म्हणजे चिखल, साचलेले घाण पाणी, दुर्गंधी आणि गैरसोयींचे केंद्र बनले आहे.

महिला ग्राहकांनीही संताप व्यक्त करत, चिखलातून मार्ग काढत खरेदी करावी लागत असल्याने मोठा त्रास होत असल्याचे सांगितले. बाजार परिसरातील अस्वच्छतेमुळे नागरिकांमध्येही नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, बाजारातून कमिटी वसूल करणाऱ्या संबंधित व्यक्तीनेही सांगितले की, बाजारातील शेड, जनावरांसाठी जागा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि इतर सुविधांबाबत नगरपंचायतीकडे वारंवार पाठपुरावा केला आहे. मात्र याकडे सातत्याने दुर्लक्ष होत आहे. सोयगावचा साप्ताहिक बाजार हा परिसरातील प्रमुख बाजार असून दर आठवड्याला हजारो नागरिक, व्यापारी आणि शेतकरी येथे येतात. तरीही अनेक वर्षांपासून मूलभूत सुविधांचा अभाव कायम असल्याने व्यापाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

व्यापारी, शेतकरी आणि नागरिकांनी नगरपंचायतीला इशारा देत तातडीने बाजार परिसरात मुरूम टाकून चिखलमुक्त करावा, पावसाच्या पाण्याचा प्रभावी निचरा करावा, कायमस्वरूपी शेड उभारावे, स्वच्छता राखावी, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी आणि बाजाराचे नियोजनबद्ध आधुनिकीकरण करावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे. बाजार शुल्क नियमित घेतले जाते; मग सुविधा का नाहीत? असा सवाल आता व्यापारी, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात असून, नगरपंचायतीने याकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी जोर धरत आहे.

---

## थोडक्यात

### श्री ढोकेश्वर पतसंस्थेच्या वसुली कारवाईला न्यायालयाची मान्यता

### थकीत कर्जदारास सहकार न्यायालयाची चपराक

**अक्षराज : वसंत रांधवण**




**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. या पतसंस्थेच्या थकीत कर्ज वसुली प्रकरणात महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने संस्थेच्या बाजूने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. थकीत कर्जदार विजयकुमार बन्सीलाल गांधी यांनी दाखल केलेले अपील न्यायालयाने फेटाळून लावल्याने संस्थेच्या वसुली कारवाईला कायदेशीर बळ मिळाले आहे. संस्थेकडून संबंधित कर्जदाराविरुद्ध थकीत कर्ज वसुलीसाठी कायदेशीर प्रक्रिया राबविण्यात आली होती. संस्थेला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम १०१ अंतर्गत वसुली दाखला प्राप्त झाल्यानंतर कलम १५६ अन्वये तारण व विनातारण मालमत्ता जप्तीची कारवाई करण्यात आली. जप्त मालमत्तेचा लिलाव रोखण्यासाठी संबंधित कर्जदारांनी सहकारी न्यायालय, अहिल्यानगर येथे लवाद दावा क्र. १३१/२०२५ दाखल करून मनाई हुकूमाची मागणी केली होती. मात्र, न्यायालयाने ही मागणी फेटाळून लावली. यानंतर कर्जदारांनी सहकारी न्यायालयाच्या निर्णया विरोधात महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात अपील दावा क्र. ५/२०२६ दाखल केला. या अपिलाची सुनावणी झाल्यानंतर खंडपीठाने ही कर्जदारांचे अपील नामंजूर केले.

संस्थेच्यावतीने या प्रकरणात ॲड. कृष्णा पंडितराव झावरे यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. निकालानंतर संस्थेचे चेअरमन भाऊसाहेब किसन लोंढे यांनी समाधान व्यक्त करत हा निर्णय थकीत कर्जदारांसाठी धडा ठरणारा असल्याचे सांगितले. ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण आणि त्यांना वेळेत ठेवी परत मिळाव्यात, यासाठी संस्था कायदेशीर मार्गाने वसुलीची कारवाई करत असल्याचे सांगितले. ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण आणि त्यांना वेळेत ठेवी परत मिळाव्यात, यासाठी संस्था कायदेशीर मार्गाने वसुलीची कारवाई करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

---

### ताजबाग शरीफ येथील १०४ वा वार्षिक उर्सनिमित्त

### ९ जुलैला वाकी दरबारकडून निघणार शाही संदल

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.०८, नागपूर :** सूफी संत हजरत बाबा ताजुद्दीन औलिया यांच्या ताजबाग शरीफ येथील १०४ वा वार्षिक उर्सनिमित्त गुरुवार, दिनांक ०९ जुलै २०२६ रोजी श्री बाबा ताजुद्दीन दर्गा वाकी ट्रस्टच्या वतीने पारंपरिक शाही संदल सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या श्रद्धा, भक्तिभाव आणि धार्मिक उत्साहात हा सोहळा पार पडणार असून, जिल्ह्याच्या विविध भागांतून तसेच परिसरातील भाविक या शाही संदलमध्ये सहभागी होणार असल्याची माहिती ट्रस्टने दिली. वाकी दरबारातून सकाळी शाही संदलची सुरुवात होईल. त्यानंतर संदल छोटा ताजबाग (सक्करदरा) येथील अन्नक्षेत्रात दुपारी १२.३० वाजता पोहोचेल. येथे भाविकांसाठी कव्वालीचा आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आला असून त्यानंतर दुपारी २.०० वाजता शाही संदल पुन्हा ताजबाग शरीफकडे प्रस्थान करेल. संपूर्ण मार्गावर विविध ठिकाणी भाविकांकडून शाही संदलचे स्वागत करण्यात येणार असून, धार्मिक वातावरणात हा सोहळा संपन्न होईल.

हजरत बाबा ताजुद्दीन औलिया यांच्या उर्सनिमित्त दरवर्षी निघणाऱ्या शाही संदलला विशेष धार्मिक महत्त्व आहे. सर्वधर्मसमभाव, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या या परंपरेत विविध समाजातील नागरिक मोठ्या श्रद्धेने सहभागी होत असतात. उर्स काळात ताजबाग परिसरात देशभरातून येणाऱ्या भाविकांमुळे भक्तिमय वातावरण निर्माण होते. या शाही संदलमध्ये जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी होऊन बाबा ताजुद्दीन यांचे दर्शन घ्यावे व आशीर्वाद प्राप्त करावा असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष तथा सज्जादा नशीन प्रभाकरजी डहाके पाटील यांनी केले आहे. तसेच धार्मिक कार्यक्रमादरम्यान शिस्त व परंपरेचे पालन करून सोहळा यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असेही त्यांनी नमूद केले.

---

### सोयगाव एस.टी.बस स्थानकावरील कँटीनची दुर्दशा

### प्रवाशांना चहा, पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** सोयगाव येथील एस.टी. बसस्थानकावरील कँटीनची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून प्रवाशांना चहा, नाश्ता तर दूरच; साधे पिण्याचे पाणीही उपलब्ध होत नसल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी सुरू करण्यात आलेले कँटीन सध्या केवळ नावापुरतेच उरले असल्याची परिस्थिती आहे. दररोज शेकडो प्रवासी या बसस्थानकावरून प्रवास करतात. अनेक बसगाड्या येथे काही काळ थांबत असल्या तरी प्रवाशांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत. कँटीनमध्ये चहासाठी केवळ रिकामी किटली ठेवलेली असून पिण्याच्या पाण्यासाठी ठेवलेला जारही रिकामा असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे प्रवाशांना चहा किंवा पिण्याचे पाणी मिळवण्यासाठी बसस्थानकाबाहेर भटकंती करावी लागत असून पिण्याच्या पाण्यासाठीही पैसे मोजावे लागत आहेत. एस.टी. महामंडळाकडून प्रवाशांच्या सोयीसाठी बसस्थानकांवर कँटीन सुरू करण्यात आले आहेत. मात्र सोयगाव बसस्थानकावरील कँटीन अनेक वर्षांपासून प्रभावीपणे कार्यरत नसल्याने त्याचा प्रवाशांना कोणताही लाभ होत नसल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. याबाबत नागरिक व दिव्यांग बांधवांनी तीव्र संताप व्यक्त करत प्रशासनाने तातडीने कँटीन सुरू करून चहा, नाश्ता व शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा हे कँटीन गावातील बेरोजगार दिव्यांगांना चालविण्यासाठी देण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात एस.टी. आगार प्रमुख तसेच जिल्हा आगार प्रमुख यांना निवेदन देण्यात येणार असून मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा दिव्यांग बांधवांनी दिला आहे. दिव्यांग बांधव भास्कर शीखंडे व यासिन बेग यांनी सांगितले की, प्रवाशांच्या सोयीसाठी असलेले कँटीन बंद ठेवणे ही गंभीर बाब असून प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**प्रवाशांचा सवाल :-**

प्रवाशांच्या सोयीसाठी उभारलेले कँटीनच जर बंद असेल, चहा व पिण्याचे पाणीच मिळत नसेल, तर अशा कँटीनचा उपयोग तरी काय?